Jagdamba Education Society's

# Santosh N. Darade Polytechnic

**At.Babhulgaon, Tal.Yeola, Dist.Nashik- 423 401**

Accredited by NBA NATIONAL BOARD OF ACCREDITATION

## * Central Library *

Please Consider the Environment Before Printing…

**Date: 22/08/2025**

## Activity Name: Day Special

## दिन विशेष

**News Paper Name: आपलं महानगर**

**Page No. 04**

आपल्या बातम्या, आतल्या बातम्या... आपलं महानगर My महानगर.com www.mymahanagar.com

# दिनविशेष

## लोकप्रिय अभिनेते, दिग्दर्शक सूर्यकांत मांढरे



सूर्यकांत मांढरे उर्फ वामन तुकाराम मांढरे हे एक भारतीय अभिनेते आणि दिग्दर्शक होते. त्यांचा जन्म २ जून १९२६ मध्ये कोल्हापूर येथे झाला. त्यांनी १०० हून अधिक चित्रपटांमध्ये काम केले. त्यांना मराठी चित्रपटसृष्टीच्या इतिहासातील सर्वात महान आणि प्रभावशाली अभिनेत्यांपैकी एक मानले जाते. अभिनेते आणि चित्रपट निर्माते चंद्रकांत मांढरे हे सूर्यकांत यांचे मोठे भाऊ. कलेत त्यांच्या योगदानाबद्दल भारत सरकारने १९७३ मध्ये त्यांना पद्मश्री देऊन सन्मानित केले.

त्यांनी त्यांचे शिक्षण कोल्हापूर येथील सरस्वती विद्यालय आणि हरिहर विद्यालयातून पूर्ण केले. त्यांनी चित्रकार बाबा गजबर यांच्याकडून चित्रकलेचे शिक्षणही घेतले. सूर्यकांत यांनी वयाच्या बाराव्या वर्षी भालजी पेंढारकर यांच्या ध्रुवमध्ये बालकलाकार म्हणून आपल्या अभिनय कारकिर्दीला सुरुवात केली. १९४३ साली पेंढारकर यांच्यासोबतचा दुसरा सहयोगी चित्रपट 'बहिर्जी नाईक' मध्ये त्यांनी भूमिका केली. अभिनेत्री जयश्री गडकर यांच्यासोबत सूर्यकांतची जोडी खूप गाजली. मोहित्यांची मंजुळा (१९६०), सुभद्रा हरण (१९६३), साधी माणसं (१९६५), पाटलाची सून (१९६६) यासह ७० चित्रपटांमध्ये एकत्र दिसले. अनंत माने यांच्या सांगते ऐका (१९५९) आणि दिनकर डी. पाटील यांच्या मल्हारी मार्तंड (१९६५) यांसारख्या ग्रामीण चित्रपट शैलीतील चित्रपटांसाठी ते प्रसिद्ध होते. केतकी बनत, स्त्री जन्मा तुझी कहानी, ग्रह देवता, बाळा जो जो रे मध्ये त्यांनी नायकाची भूमिका केली आहे. सुलोचना आणि उषा किरण यांच्यासोबतचे त्यांचे चित्रपटही गाजले. चित्रपटांसोबतच त्यांनी तुझे आहे तुजपाशी, लग्नाची बेडी, झुंजारराव, बेबंदशाही अशा अनेक नाटकांमध्ये काम केले. सूर्यकांत यांचे २२ ऑगस्ट १९९९ रोजी निधन झाले.

Nashik Edition

Aug 22, 2025 Page No. 4

Powered by: erelego.com

S.N.D. POLYTECHNIC, BABHULGAON * YEOLA DIST. NASHIK * CENTRAL LIBRARY

LIBRARIAN
MR.U.D. MULANI
SND POLYTECHNIC
YEOLA-423401

PRINCIPAL
PROF.U.B JADHAV
SND POLYTECHNIC
YEOLA-423401